KOLHAPUR ENGINEERING ASSOCIATION

# परवाना नुतनीकरण शिबीरास उत्तम प्रतिसाद

कोरोनामुळे लांबणीवर पडलेले तसेच आर्थिक समस्येमुळे अनेक उद्योजक व व्यापा-यांचे महापालिका परवाना नुतनीकरण केले नव्हते. महापालिकेनेही परवाना नुतनीकरणास वेळोवेळी मुदतवाढही दिली होती. कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशने परवाना नुतनीकरण शिबीर असोसिएशनमध्ये आयोजित करण्याची मागणी महापालिकेकडे केली होती. या मागणीची दखल मा.प्रशासक कादंबरी बलकवडे यांनी घेवून शिवाजी उद्यमनगर, वाय.पी.पोवारनगर,पांजरपोळ तसेच आसपासच्या परिसरातील उद्योजक-व्यापा-यांचे परवाना नुतनीकरण करण्यासाठी कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन येथे विशेष शिबीर आयोजित करण्याचे आदेश महापालिका परवाना विभागास दिले होते. यानुसार दि.16 व 17 डिसेंबर 2021 असे दोन दिवसाचे शिबीर आयोजित केले आहे. या शिबीरास उद्योजक व व्यापा-यांनी चांगला प्रतिसाद दिला आणि आज पहिल्या दिवशी 68 उद्योजक व व्यापा-यांनी सहभाग नोंदवून आपले परवाना नुतनीकरण करून घेतले. इंजिनिअरिंग असोसिएशन तर्फे या शिबीरासाठी संगणक,लॅपटॉप व इंटरनेटची सुविधा उपलब्ध करून दिली होती. या शिबीरास उपायुक्त शिल्पा दरेकर मॅडम यांनी भेट देवून मार्गदर्शन व समाधान व्यक्त केले. उद्योजकांनी यापुढे प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्यातच असे शिबीर आयोजित करण्याची मागणी केली असून महापालिकेने यास सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यावेळी उद्योजक-व्यापा-यांनी त्यांचा वेळ व श्रम वाचल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. उद्या दि. 17 डिसेंबर रोजी पुन्हा एकदा सकाळी 10 ते दुपारी 3 यावेळेत शिबीराचे आयोजन केले असून उद्योजक व व्यापा-यांनी आपले व्यवसाय परवाना नुतनीकरण करून घ्यावा असे आवाहन महापालिका आणि इंजिनिअरिंग असोसिएशन तर्फे करण्यात आले आहे. सदरचे शिबीर आयोजनामध्ये महापालिकेचे परवाना अधिक्षक श्री.राम काटकर, परवाना विभागातील कर्मचारी विजय वाघेला, मंदार कुलकर्णी, बाळासो‍ा जाधव, फायर ऑफिसर के.वाय.बांदेकर, सिस्टीम मॅनेजर यशपाल रजपूत, तुषार नागवेकर, सुनिता झगडे, लियाकत बारसकर, सुमित घोटणे, प्रसाद कराळे, शकिल पटाण, इंजिनिअरिंग असोसिएशनचे सहसचिव श्री.प्रसन्न तेरदाळकर, खजाणिस श्री.कमलाकांत कुलकर्णी, सचिव श्री.प्रदीप व्हरांबळे, पीआरओ श्री.प्रशांत मोरे, भगवान मुडळे, राम कुंभार अमित सरंजामे इ. उपस्थित होते.


कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन
उद्योगपती राम मेनन प्लाझा




उद्योगपती राम मेनन प्लाझा